
# NATIONAL CONFERENCE ON MULTIDISCIPLINARY RESEARCH NCMR-2021

ORGANIZED BY

SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY AMRAVATI'S
SHRI PUNDLIK MAHARAJ MAHAVIDYALAYA, NANDURA

IN COLLABORATION WITH

DEPARTMENT OF LIFELONG LEARNING AND EXTENSION,
SGB AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI




ISBN-978-81-951551-4-9

Scanned with CamScanner

ISBN : 978-81-95551-4-9

# NCMR21- Peer-Reviewed Book Chapter

**Edited by**

**Shri Pundlik Maharaj Mahavidyalaya,**
**Nandura Rly. Dist. Buldana-443404.**

**© Aadhar Publications,**

**All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means without permission. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.**

***First published, 31 March, 2021***

**ISBN** 978-81-95551-4-9

**Published by**
**Prof. Virag Gawande for**
**Aadhar Publications,**
**Behind Govt. VISH,**
**New Hanuman Nagar,**
**Amravati 444 604.**
**Mob-9595560278**

**Aadhar Graphics,**
**Amravati.**

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

Scanned with CamScanner

ISBN : 978-81-95551-4-9

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Ethnoveterinary Medicinal plants used in a tribal population of Hingna forest Area, Nagpur (MS) India **Rupali Chaudhary /Madhuri Bhonde /Subhash Somkuwar** | 1 |
| 2 | Phytochemical Analysis Of Leaf Extract **Acacia Nilotica /Mimosa Pudica/ P. N. Deshmukh** | 9 |
| 3 | A New Bryophytic Axis From Deccan Intertrappean Beds Of Mohgaonkalan, M.P. Central India Introduction **Dighe S. W /Kokate P. S /Bobade M.B.** | 14 |
| 4 | Antioxidant activity of some honey bee pollen loads by FRAP assay **Anita Katgaye/ Surekha Kalkar** | 19 |
| 5 | A Report Of New Fossil Seed From Deccan Intertrappean Beds Of Mohgaonkalan, M.P. India **Pundkar S.V. / Kokate P.S.** | 23 |
| 6 | A Review on Some Wild Medicinal Plants from Nanded District (MS), India **S. D. Raut, /S. S. Shinde, /M. K. Malviya** | 29 |
| 7 | Biochemical Composition Of Some Cyanobacteria **Lalita L.Sawarkar/ Supriya B. Gedam** | 36 |
| 8 | Flora of Warud College Campus Area **Dr. Mrs. Sharada K. Ulhe - Deshmukh** | 39 |
| 9 | Impact Of Pesticides Use In Agriculture: Hazards On Farmers Health **B. G. Pawar / R. G. Pawar** | 47 |
| 10 | Extending the Blanket of Nutrition Awareness by Assessing Body Composition and KAP of Practicing Physicians **Charmaine Dunn / Vibha Hasija** | 50 |
| 11 | Estimation of Nitrates in Drinking Water Samples of Shegaon Region and Study of its Associated Health Effects **Dr.Smita Tarale / Dr.Rameshwar Khadsan** | 57 |
| 12 | Studies Of Interaction Of Lightwith Different Concentration Of Ligands In Various Media By Refractrometry. **G.D.Tambatkar,Y.P.Wayal** | 62 |




Scanned with CamScanner

ISBN : 978-81-95551-4-9


| | | |
|---|---|---|
| 13 | Solution Behaviour of α-amino acid in presence of some transition metal salt in Dioxane-water Mixture **J.V. Phirke** | 66 |
| 14 | Review On Microwave Technique And Its Application **Nilesh G. Jadhao** | 70 |
| 15 | A Review on Heterocyclic Compounds: Application in Medicinal Chemistry of Different Heterocyclic Moiety **Amol S. Nipate / Sunil J. Chavan /Nilkesh K. Dhurve /Mahesh B. Muluk** | 73 |
| 16 | Synthesis And Characterisation Of *S*-Hepta-*O*-Benzoyl Lactosyl-1-Aryldithiocarbamates **Prof. Dr.Ku.Reena J. Deshmukh** | 81 |
| 17 | Synthesis, Spectral Studies and Antimicrobial activity of Schiff Base Complexes of Neodymium **Dr. Shilpa P. Idhol** | 85 |
| 18 | Extremophiles: Basic concepts **Anupama. P. Pathak** | 89 |
| 19 | ZnS thin films For Solar cell application **Sachin V. Mukhamale** | 92 |
| 20 | A Comparative Study Of Super Capacitor & Conventional Capacitor **S.K.Ganvir/ Dr.G.K.Reddy** | 95 |
| 21 | Li FiTechnology **Shweta A. Mankar** | 102 |
| 22 | Ecology of Web with respect to Orb-web builders of Satpuda Landscape **Dr. Anuradha Rajoria** | 105 |
| 23 | Fish Faunal Diversity of Chankapur Dam, Kalwan (Nashik District) Maharashtra, India. **Ashutosh M. Nirbhavane/ Shantaram B. Bhoye/Nalesh G. Bahiram** | 115 |
| 24 | The Study of Zooplanktons at Ambona Lake **V.V. Bhoyar** | 119 |
| 25 | Physico-Chemical Analysis of Soils from Sinnar Tahsil, Nashik District, (M.S.) India. **ShantaramBhoye/Ashutosh Nirbhavane/ Seema Kshirsagar** | 123 |
| 26 | Literature And Its Universality **Mr.C.N.Rathod** | 128 |
| 27 | The theme of "The Scarlet Letter" is that of Sin, Punishment and Regeneration. **Dr. Laxman Gajanan Kolte** | 131 |
| 28 | Paul Theroux'sPerspective on Locale in Travelogue **Dr. Sanjay L. Khandel** | 135 |




Scanned with CamScanner

ISBN : 978-81-95551-4-9


| | | |
|---|---|---|
| 29 | Impact Of Karmayoga On Social Relationship **Dhananjay Narayan Kokil** | 139 |
| 30 | Participation of Youth in Elections **Dr.Rajendra Korde** | 142 |
| 31 | A qualitative study of different adverse impact on girl's education due to COVID-19 pandemic **Pooja Alone** | 146 |
| 32 | Gender Discrimination and Human Rights **Dr. R.G. Suralkar** | 151 |
| 33 | Role of information technology in enhancing sports Performance **Ulhas V. Bramhe** | 154 |
| 34 | Vocational Education & Skill Developement In India **Miss - Vrushali W. Warade.** | 158 |
| 35 | Nobel Prize winner Abhijit Vinayak Banerjee and his Research Understanding Development and Poverty Alleviation. **Dr. S.M.Kalakhe** | 162 |
| 36 | Impact of Information Technology on Indian Economy **Komal Prabhakar Ladhe** | 167 |
| 37 | Entrepreneurship and Indian Economy **Dr. P. N. Ladhe** | 172 |
| 38 | Black Money and Indian Economy **Prof. Dr. Prashant S. Vairalkar /Prof. Purushottam M. Kute** | 177 |
| 39 | Atrs : A New Tech To Civil Avaition Security **Gireeshan.P, / Beulah Shekhar** | 183 |
| 40 | Role of Library in Indian Society **Dr. Gavhane Maharudra Prabhu** | 188 |
| 41 | Online Resources And Services In Virtual Era**Prof. Pratibha N. Atram** | 192 |
| 42 | Application of Ontologis in Academic Digital Libraries **Prof. Atul D. Vikhe** | 195 |
| 43 | Role Of Academic Libraries In the Human Resource Development Of Information Technology **Ranjana K. Jawanjal** | 199 |
| 44 | Impact of New Technologies on Information Services **Prof. Shubhangi Akotkar** | 203 |
| 45 | Inevitable ICT Components and its impact on Library and Librarian Professionals of the Academic Library **Dr. Sunil D. Belsare** | 207 |
| 46 | Trends, Opportunities and Scope of Libraries During Covid-19 Pandemic Situation **Mrs. Rakte Jyoti Bhausaheb** | 211 |




Scanned with CamScanner

ISBN : 978-81-95551-4-9



| | | |
|---|---|---|
| 47 | Advantages and Disadvantages Virtual Platform In Covid -19 Pandemic **Prof. Shubhangi Akotkar** | 216 |
| 48 | Actinomycetes and Their **Uses Gautam T. Kamble,/ Anupama P.Pathak** | 221 |
| 49 | Machining of Fiber Reinforced Plastics **Nitesh Kumar Jha, Garima Hirekar** | 223 |
| 50 | Light Fidelity Communication Mechanism **1C.R.Chaudhari and 2Dr.G.K.Reddy** | 229 |
| 51 | The Composition and Arrangement of Nest Materials and Other Key Nest Characters Such as Their Dimensions or Weight. **Sachin D. Jadhav*, Tejaswini R. Marakwad** | 235 |
| 52 | Exploration of Mangrove Vegetation for Industrially Important Microorganisms. **Joshi Vikas 1*, Dr.Mrs.Pathak Anupama2** | 241 |
| 53 | पुण्यप्रभाव यश-अपयश डॉ. सुनंदा के. रेवसे | 247 |
| 54 | मराठी साहित्यातील ग्रामीण कथा एक अभ्यास प्रा. अनिल आराक | 249 |
| 55 | स्थानिक इतिहास लेखन : इतिहास संशोधन क्षेत्रातील एक महत्वपुर्ण दृष्टीकोन. प्रा. उमेश मनोहर राऊत | 252 |
| 56 | ब्रिटीश राजवटीत महाराष्ट्रात झालेल्या सामाजिक सुधारणा डॉ.व्ही.आर.तिरपुडे | 256 |
| 57 | सद्य:स्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या मंदीची कारणमिमांसा प्रा. पुरूषोत्तम मधुकर कुटे /प्रा.डॉ. प्रशांत एस. वैराळकर | 259 |
| 58 | लोककल्याणकारी राजा राजर्षी शाहू महाराज सहा. प्रा. डॉ. कदम मोतीराम विठ्ठलराव | 264 |
| 59 | मल्हारराव होळकर - उत्तर हिंन्दूस्थानच्या राजकारणातील एक जाणकार व्यक्तीमत्व **प्रा. डॉ. व्ही.जी. वसु** | 268 |
| 60 | Dealing With Teenager Depresion **Shewta Mishra** | 270 |



Scanned with CamScanner

ISBN : 978-81-95551-4-9

# सद्य:स्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या मंदीची कारणमिमांसा

प्रा. पुरूषोत्तम मधुकर कुटे
सहायक प्राध्यापक, वाणिज्य विभाग कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा, जि. अमरावती.
प्रा.डॉ. प्रशांत एस. वैराळकर
सहायक प्राध्यापक, वाणिज्य विभाग जगदंबा महाविद्यालय, अचलपूर, जि. अमरावती.

- प्रस्तावना :

देशाची आर्थिक स्थिती नेहमीच स्थिर राहील असे नाही. आर्थिक स्थितीला सुध्दा परिवर्तनशीलतेचे तत्व लागू पडते. कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत सतत बदल घडून येत असतात. ज्यामध्ये लोकसंख्या, उत्पन्न, रोजगारपातळी, विनिमय दर, बचत व गुंतवणूक, किंमतपातळी, उपभोग, लोकांच्या आवडी–निवडी इ. घटकात नेहमी बदल होत असतात. त्याच बरोबर नैसर्गिक आपत्ती (महामारी, भूकंप, जलप्रलय/महापूर इ.) आणि मानविय आपत्ती (युध्द, तीव्र व्यापार स्पर्धा, साठेबाजी इ.) देखल कधिकधी निर्माण होते. हे बदल जेव्हा मोठ्या प्रमाणात घडून येतात तेव्हा देशाच्या अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होवून अर्थव्यवस्थेला मोठे धक्के बसतात. त्यामुळे वस्तूच्या मागणी पुरवठयात मोठया प्रमाणात असंतूलन निर्माण होवून अर्थव्यवस्थेवर मंदीचे संकट निर्माण होते. देशाच्या आर्थिक विकासाला ब्रेक लागतो. बेरोजगारी मोठया प्रमाणात वाढते. अर्थव्यवस्थेत सगळीकडे नैराश्यतेचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (ळक्च) घट होण्यास सुरूवात होते. ही घट जर सतत तीन तीमाही पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी पर्यंत होत असेल तर त्या स्थितीला मंदी असे म्हटल्या जाते.

'जेंव्हा देशातील वस्तू व सेवांच्या उत्पादनात सातत्याने घट होवून त्यामूळे देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात निरंतर (मागील तीन तीमाही) घट होते तेंव्हा अशा स्थितीला आर्थिक मंदी असे म्हणतात.'

**देशांतर्गत मंदीची कारणे**

**१. देशाच्या औद्योगिक उत्पादनात घट :**

भारतात मार्च २०२० मध्ये औद्योगिक उत्पादनात १६ टक्के घट झाली आहे. दैनंदिन उपभोच्या वस्तूंची विक्री अत्यंत संथ सुरु आहे. हिंदुस्थान यूनिलीवर लिमिटेडच्या उत्पादनांचा विक्रीचा वृध्दी दर एप्रिल–जून २०१८ मध्ये १२: होता. त्यामध्ये घट होऊन तो एप्रिल–जून २०१९ मध्ये ५: पर्यंत खाली आला आहे. अशा प्रकारे अर्थव्यवस्थेतील उद्योगक्षेत्राच्या उत्पादन क्षमतेत घट होण्याची प्रवृत्ती निर्माण झाल्यामुळे देशाच्या एकूण उत्पादन क्षमतेत कमालीची घट झाली आहे.

**२. देशाच्या निर्यातीत घट :**

देशात कोविड–१९ मुळे बरेच दिवस उद्योग व्यवसायात कडकडीत बंद होते. ते अजुनही पूर्ण कार्यक्षमतेने सुरु झालेले नाही. गेली कित्तेक दिवस उत्पादन पूर्ण कार्यक्षमतेने न झाल्यामुळ



Scanned with CamScanner

ISBN : 978-81-95551-4-9

त्याच बरोबर जागतिक स्तरावर वस्तूंच्या मागणीत प्रचंड प्रमाणात घट झाल्यामुळे एप्रिल २०२० मध्ये देशाच्या एकूण निर्यातीत ६०.३: घट झाल्याचे दिसून येते.

३. रेल्वे उत्पन्नात घट :

भारतीय रेल्वे व्दारा ज्यादातर माल वाहतूक मध्ये दगडी कोळसा, कच्चे लोखंड (पोलाद), उर्वरक, पेट्रोलियम इ. वस्तूंचा समावेश आहे. जेव्हा रेल्वेव्दारे या वस्तूंची मोठ्या प्रमाणात वाहतूक होते तेव्हा ते गुंतवणूक व औद्योगिक गतीविधींसाठी शुभ संकेत समजल्या जाते. परंतू एप्रिल–जून, २०१९ मध्ये या सुचकांकामध्ये २.७: वृध्दी झाली आहे. परंतू हा मागील अडीच वर्षातील न्युनतम स्तर आहे. कोविड–१९ मुळे यामध्ये आणखी भर पडून देशात लॉकडाऊनमुळे बराच काळ रेल्वे वाहतूक बंद होती आणि उत्पादन व मागणी मध्ये कमालीची घट झाल्यामुळे त्याचा एकंदरीत रेल्वेच्या माल वाहतूकीवर प्रतिकूल परिणाम होऊन त्यामध्ये ३५: पर्यत घट झाली आहे.

४. एकूण राष्ट्रीय उत्पादनात घट :

क्रिसिल च्या अहवाला नुसार कोविड–१९ मुळे भारतीय अर्थव्यवस्था किमान ५ टक्केनी आकसणार असून त्यातील २५ टक्के घसरण ही केवळ एप्रिल ते जून २०२० या पहिल्या तिमाहितच होणार आहे. यात एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या ;ळक्च्द्ध १०: नुकसान अपेक्षित आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली व आय. आय. टी. मुंबई यांच्याव्दारे प्रकाशीत अहवालातील माहितीच्या आधारे भारतात पहिल्या २१ दिवसाच्या काळात ढोबळ देशांतर्गत उत्पन्नाच्या जवळपास ३.४६: इतके नुकसान होण्याची शक्यता आहे. जर ही टाळेबंदी पुढील दोन महिने सुरु राहील्यास १२: नुकसान होऊ शकते. असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

५. भारतात प्रवासी वाहनांच्या विक्री घट :

सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरींग ;ैप्डद्ध च्या अहवाला नुसार मार्च २०१९ च्या तुलनेत मार्च २०२० या महिन्यात भारतात प्रवासी वाहनांच्या विक्री मध्ये ५१ टक्केंनी घट झाली आहे. ती देशातील गेल्या २२ वर्षातील सर्वात मोठी घसरण आहे.

६. रोजगार क्षमतेत घट :

कोविड–१९ मुळे भारतात इतिहासातील सर्वाधिक ३० टक्के हून अधिक बेरोजगारी निर्माण झाली आहे. एकट्या ऑटो सेक्टर उद्योग व्यवसायात जुन ते ऑगस्ट, २०१९ या तीन महिन्याच्या कालावधीत दोन ते तीन लाख लोकांचा रोजगार गेला आहे.

७. देशातील एकूण मागणी व एकूण पुरवठयात घट :

देशातील एकूण मागणी व एकूण पुरवठ्यात कमालीची घट झाली आहे. सुरुवातीच्या पहिल्या दोन ४० दिसाच्या टाळेबंदी मध्ये जवळपास ६५ : उत्पादन क्षेत्र बाधित झाले आहे. त्यामुळे या कालावधीत ४० दिवसात देशाचे १४.३८ लाख कोटीचे नुकसान झाले आहे.

८. वृध्दीदरात घट :

क्रिसीलने २०२१ मध्ये एकूण देशांतर्गत उत्पादनाबाबतच्या ;ळक्च्द्ध आर्थिक वाढीचा अंदाज अपेक्षित ५.२: वरुन ३.५: पर्यत खाली आणला गेला आहे. डाबर इंडिया कंपनीचा विक्री वृध्दी दर २०१८ मध्ये २१.००: होता. तो २०१९ मध्ये ६.०: पर्यत कमी झाला आहे. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेत २०१६–१७ मध्ये विकासाचा दर ८.२: होता. २०१८–१९ च्या सर्वेनुसार त्यात घट होऊन ळक्च ५ण्८: पर्यत खाली आला असून २०१९–२० मध्ये तो ५.६: पर्यत कमी होण्याची आशंका आहे.

९. उद्योग व्यवसायाला देण्यात येणाऱ्या कर्जात कपात :

त्ठप् व्दारा प्रकाशीत आकडेवारी नुसार बॅकींग व वित्तीय संस्थांव्दारे उद्योग व्यवसायाला केल्या जाणाऱ्या कर्ज पुरवठ्यात घट झाली आहे. पेट्रोलियम, खनन, टेक्सटाइल, फर्टिलाइजर व



Scanned with CamScanner

ISBN : 978-81-95551-4-9

दुरसंचार यासारख्या उद्योग व्यवसायांनी खर्चा कपात करण्याच्या उद्देशाने कर्ज घेणे कमी केले आहे. बॅकींग व्यवसाय सुध्दा लोकांना व उद्योग व्यवसायांना कर्ज पुरवठा करतांना मागेपुढे करीत आहेत.

१०. रियल एस्टेट व्यवसायात मंदीची स्थिती :

देशात रियल एस्टेट व्यवसायात कमालीची मरगळ आली आहे. मार्च २०१९ पर्यंत भारतातील टॉपच्या ३० शहरांमध्ये १२.८० लाख घर विक्रीविना पडून आहेत. मार्च २०१८ च्या तुलनेत ही संख्या ७: ने जास्त आहे. बिल्डर ज्या गतीने घरांची निर्मिती करतात त्या तुलनेत घरांच्या विक्रीचे प्रमाण मात्र खुपच कमी आहे.

११. गुंतवणूकीत घट :

देशात एप्रिल ते जून २०१९ या कालावधीत नविन घोषीत परियोजनांच्या मुल्यात ७९. ५: घट झाली आहे. ही सप्टेंबर, २००४ नंतरची सर्वाधिक झालेली घट आहे. एप्रिल ते जून २०१९ या तिमाही मध्ये घोषित गुंतवणूक (निवेश) मूल्य ७१,३३७ करोड रुपये होते. हा सप्टेंबर, २००४ नंतरचा न्युनतम स्तर आहे.

१२. सोने व चांदीच्या आयातीत घट :

लोकांव्दारा सोने व चांदीची केली जाणारी मागणी हा अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने शुभ संकेत आहे. एप्रिल ते जून, २०१९ या तिमाही मध्ये सोने व चांदीची आयात ही मागील वर्षीच्या तुलनेत ६.३: वरुन ५.३: पर्यंत कमी झाली आहे.

१३. नोटबंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम :

दिनांक ८ नोव्हेंबर, २०१६ रोजी केंद्र सरकारव्दारे घोषित केलेल्या नोटबंदीमुळे देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणम झाला आहे. वर्ष २०१५–१६ मध्ये भारताचा जीडीपी ग्रोथ रेट हा ८.०१: होता. तो २०१६–१७ मध्ये ७.११: पर्यंत कमी झाला. या एका वर्षाच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेला २.५ लाख करोड रुपयाचे आर्थिक नुकसान झाले. नंतर तो पुढील वर्षी ६. १: पर्यंत कमी झाला. नोटबंदीमुळे १५ करोड दिहाडी मजदुरांचे कामधंदे बंद झाले. हजारो लहान मोठे उद्योग व्यवसाय बंद पडले व लाखो लोक बेरोजगार झाले. सद्य:स्थितीत फिच रेटिंग्ज च्या अंदाजा नुसार भारताचा जीडीपी विकास दर ५.६: वरुन ५ण१: पर्यंत कमी करण्यात आला आहे.

१४ण ळैज चा परिणामरू

देशात ळैज लागू होण्याच्या आधी अप्रत्यक्ष करसंग्रह की वृध्दी दर २१.३३: होता. परंतू जीएसटी लागू झाल्या नंतर २०१७–१८ मध्ये त्यात घट होऊन ५.८०: झाला. त्याचे प्रमाण आधिच्या तुलनेत खुपच कमी आहे. त्यामुळे सरकारच्या करापासून प्राप्त उत्पन्नात घट झालेली दिसून येते.

१५. महापूरामुळे कृषी उत्पादनात झालेली घट :

अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरात पश्चिम महाराष्ट्रासह कोंकण, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात ऑगस्ट, २०१९ मध्ये शेती, पशुधन, लघुउद्योग, आणि घरांचे सुमारे १२ हजार कोटींहून अधिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

१६. बॅकींग क्षेत्रातील गैरव्यवहारामूळे लोकांच्या बचतीत व गुंतवणूकीत झालेली घट

देशातील सर्व व्यापारी बॅकांचे प्राधान्य क्षेत्रातील अनुत्पादक कर्जाचे प्रमाण वर्ष २०१८ मध्ये २१.६:ए व बिगर प्राधान्य क्षेत्र ७८.४:, शेती क्षेत्र ८.६:, सुक्ष्म व लघुउद्योग ९.५: तर इतर प्राधान्य क्षेत्रात ३.५: इतके मोठया प्रमाणात होते. त्याचा या क्षेत्रातील उत्पादन क्षमतेवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. त्याच बरोबर भारतीय बॅकींग क्षेत्रात झालेल्या घोटाळ्यांची संख्या विचारात घेतल्यास वर्ष २०१३ बॅक घोटाळयाची एकूण रक्कम १०१७०.८० कोटी रुपये होती. त्यात वाढ होऊन ती



Scanned with CamScanner

ISBN : 978-81-95551-4-9

अनुक्रमे २०१४–१५ मध्ये १९४५५.१०, २०१५–१६ मध्ये १८६९८.८०, २०१६–१७ मध्ये २३९३३.९०, २०१७–१८ मध्ये ४११७६.७० आणि २०१८–१९ मध्ये ७१५४३.०० कोटी रु. इतकी प्रचंड वाढ होत गेली आहे. त्यामुळे लोकांचा बॅकींग व्यवसायावरचा विश्वास काही प्रमाणात कमी झाल्याने लोकांची बॅकेतील बचत प्रभावीत झाली आहे. त्याचा देशातील गुंतवणूकीवर विपरीत परिणाम झाला असून गुंतवणूकीचे प्रमाण कमी झाले दिसून येते. त्यामुळे देखील देशाच्या अर्थव्यवस्थेत मरगळ आलेली दिसून येते.

- उपाययोजना व शिफारशी :

१. सरकारी खर्चात वाढ करणे :

अर्थव्यवस्थेतील मंदी दुर करण्यासाठी सरकारणे आपल्या खर्चात वाढ करायला पाहिजे, जेणे करुन लोकांच्या क्रयशक्तीत भर पडेल. लोकांची क्रयशक्ती वाढल्यास वस्तू व सेवांची मागणी वाढेल. त्यामुळे गुंतवणूकीत वाढ होऊन उत्पादनात व मौद्रीक उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

२. करदरात सूट देणे :

सरकार जनतेवर कराची आकारणी करुन उत्पन्न मिळवित असते. ज्या प्रमाणात कराचा दर आकारला जातो त्यानुसार सरकारला उत्पन्न प्राप्त होते. जर सरकारणे जनतेला करामध्ये सवलत (सूट) दिली तर लोकांच्या मौद्रीक उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या क्रयशक्तीत वाढ हाईल. त्यामुळे वस्तू व सेवांच्या मागणी वाढ होऊन मंदीतील अंतर कमी होण्यास मदत होईल.

३. मुद्रा परिमाणात वाढ करणे :

जेव्हा वास्तविक उत्पादनाच्या तुलनेत मौद्रीक उत्पन्नाचे प्रमाण कमी असते मंदीची स्थिती निर्माण होते. अशा वेळेस सरकार व केंद्रीय बॅकेकडून अर्थव्यवस्थेतील मौद्रीक पुरवठयात वाढ करणे आवश्यक असते. मुद्रेच्या परिमाणात वाढ करण्यासाठी नवीन विधीग्राह्य मुद्रेची निर्मिती आणि बॅकानी प्रत्यय निर्मितीत वाढ करण्याच्या धोरणांचा अवलंब करावयास पाहिजे. यामुळे अर्थव्यवस्थेत पैशांचा पुरवठा वाढून वस्तू व सेवांच्या पुरवठया बरोबरच लोकांच्या मौद्रीक उत्पन्नात वाढ होऊन त्यांची क्रयशक्ती वाढेल व अपस्फीतीतील (मंदी) अंतर दूर होईल.

४. व्याज दरात कपात करणे :

गृहकर्ज, वाहन कर्ज व इतर कर्जाच्या व्याज दरात कपात करण्यात यावी. त्यामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळण्यास मदत होईल.

५. सार्वजनिक क्षेत्रातील बॅकांना आणि वित्तीय संस्थांना देण्यात येणाऱ्या निधीत वाढ करण्यात यावी.

६. सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना प्रोत्साहण देण्यासाठी सरकारणे आर्थिक मदत व अल्पदरात कर्जपुरवठा करण्याच्या धोरणाचा अवलंब करण्यात यावा.

७. सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना जीएसटीचे प्रलंबीत रिफंड त्वरीत करण्यात यावे.

८. कृषीच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी अधिक लक्ष देवून कृषीमाल प्रक्रिया उद्योगांचा विकास करणे गरजेचे आहे.

९. देशात परकीय गुंतवणूकीला चालना देण्यासाठी गुंतवणूकदारांवर अतिरीक्त लादण्यात आलेला कर मागे घेण्यात यावे.

११. सार्वजनिक क्षेत्रामार्फत ग्रामीण पायाभूत सोया–सुविधांचा विकास करण्यावर भर देणे.

१२. अर्थव्यवस्थेत नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यास प्राधान्य देऊन देशातील बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाव्दारे प्रामाणिक प्रयत्न करण्यात यावे.

१३. बॅकींग क्षेत्रातील घोटाळे कमी होण्यासाठी कडक नियम तयार करण्यात यावे.



Scanned with CamScanner

ISBN : 978-81-95551-4-9

- सारांश :

जगातील बहुतेक देशांप्रमाणेच भारतात ही कोविड—१९ महामारीचा प्रसार मोठया प्रमाणात झाल्याने एका बाजूला आरोग्य विषयक समस्या तर दुसऱ्या बाजूला टाळेबंदी यामुळे निर्माण झालेली आर्थिक समस्या व वरील कारणांमुळे देशात सद्य:स्थितीत मंदीचे सावट (मंदीची स्थिती) निर्माण झाल्याचे दिसून येते.

संदर्भ :

1. The Economics Times (Hindi) E- Paper, Date 21 Aug., 2019
2- vFkZlaokn] 2020 ,fizy&es&twu] [kaM&44@vad&1
3. mahanmk.com pkyw ?kMkeksMh] 01 ekpZ 2020 rs 31 ekpZ] 2020
4. mehtvta.com
5. cdn.ampproject.org
6. leadingfile.com
7. Lokmat News Paper, Date 14/08/2019

Scanned with CamScanner